

गट ग्रामपंचायत - खरसोली

पंचायत समिती नागपूर, जिल्हा, नागपूर.



श्री. आशिष बलदेव चुरडे — सरपंच

सौ. अर्चना परमेश्वर शिंगणे — उपसरपंच

श्री. सी.पी. मुंगले — सचिव

सदस्यगण - श्री. धर्मपाल दयाराम गुढे, श्री. धिरज नागेश्वर पंधराम, श्री. पुरूषोत्तम गंगाराम आकरे, सौ. वनिता विष्णु वरखडे, सौ. पुष्पा कृष्णाजी खडसे, सौ. शारदा अनिल तुमडाम

जावक क्र. .....

प्रती,

दिनांक ..... 131 / 3-1-12-20

श्री रामदेव अग्रवाल
रा. १३ वा फ्लोर , कॅनल रोड
रामदासपेठ नागपुर -१०

विषय: मौजा पेवठा ख.क्र. ७८ मधील मंजूर रहिवासी ले आऊट अभिन्यास हस्तांतरित करण्याबाबत.

संदर्भ: १) श्री रामदेव अग्रवाल यांचा दिनांक ०७/०३/२०१९ रोजीचा अर्ज.

२) मा. कार्यकारी अभियंता (मेट्रो) विभाग सदर नागपुर व मा. विभागीय अधिकारी (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना ग्रा. पं. चे पत्र जा. क्र ११६ दिनांक १३/ १० /२०२० अन्वये.

३) मा.सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा. अभि./ ना.म.प्र.वि.प्रा. / ५२८ दिनांक २७/१०/२०२० अन्वये.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की आपल्या अर्जानुसार व मा. सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा. अभि./ ना.म.प्र. वि.प्रा./५२८ दिनांक २७/१०/२०२० रोजीचे पत्रानुसार मौजा पेवठा ख.क्र. ७८ आराजी ६०१००.०० चौ. मीटर (६.०१ हे.आर) क्षेत्रफळात श्री रामदेव अग्रवाल यांनी अभिन्यासातील विकास करारनामा मधील अट क्र. १७,,B,C,D,E,F नुसार विकासकाने रस्त्याचे डांबरीकरण, मलवाहिका, पर्जन्यवाहिका, जलवाहिनीचे काम व खुल्या जागेस चेन लिंक फेन्सिंगचे बांधकाम पूर्ण केलेले आहे असे पत्रात नमूद आहे. वरील विकास कामे अर्जदाराने पूर्ण केल्यामुळे व ना. म. प्र. वि. प्रा. विभागीय कार्यालय दक्षिण यांचे पत्राचे आधीन राहून सदर विकास कामाची देखभाल व दुरुस्ती यापुढे ग्रा.पं. करण्यास तयार आहे. तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर कर आकारणी करून देण्याची जबाबदारी अर्जदार / ले आऊट मालकाची राहील. जोपर्यंत प्लॉटधारकाचे नावाने टॅक्स लागत नाही तोपर्यंत ले आऊट धारकाचेच नावाने टॅक्स राहील व ले आऊट धारकानांच यासमोर टॅक्स भरणा करावा लागेल. व भविष्यात सर्व प्लॉटधारकाचे टॅक्स लावून देणे लेआऊट धारकावर बंधनकारक राहील तसेच ना. म. प्र. वि. प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास व भविष्यात वाद निर्माण झाल्यास ती सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदार / ले आऊट धारक यांची राहील. ग्राम पंचायतची जबाबदारी राहणार नाही.

वरील अटी व शर्तींच्या आधीन राहून व विविध शासकीय विभागाच्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ग्राम पंचायत सदर लेआऊट अभिन्यास हस्तांतरित करण्यास तयार आहे.

करिता सविनय महितीस सादर.

दिनांक : २९/१२/२०२०

सरपंच
गट ग्रा. पं. खरसोली

उघडयावर शौचास बसु नका, शौचालयाचा वापर करा. हागणदारी मुक्त गांव करण्यास सहकार्य करा.

प्रोसीडिंग बुक (कारवाई बुक)

ग्रामपंचायत – खरसोली तहसील – नागपूर जिल्हा – नागपूर सन २०२०-२१

नंबर सभेच्या दिनांक व तारीख	हजर सभासदांची नावे	ठरावाच्या मसुदा	सूचक / अनुमोदन	थोडक्यात चर्चा	तर्फेची संख्या व सही	विरोधकांची संख्या व सही	तटस्थाची संख्या व सही	ठराव पास किंवा नापास	सचिवांचे मत	अधिकाऱ्यांचीसही
९/१ २८/१२/२०२०	श्री आशीष बलदेव चुरड सरपंच व हजेरी रजिस्टर प्रमाणे उपस्थित ग्रा.पं.सदस्य	ठराव क्र. ९/१ येणाऱ्या अर्जावर विचार विनिमय करणे.		मासिक सभा दिनांक - २८/१२/२०२० वेळ - दुपारी १२.०० वाजता ठराव क्र. ०९/०१ : मौजा पेवठा ख.क्र. ७८ मधील मंजूर रहिवास्याचे अभिन्यास हस्तांतरण करण्याबाबत अर्ज व मा.सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्राचे अनुषंगाने. **खुलासा** :- वरील विषयानुसार आजच्या सभेत श्री रामदेव अग्रवाल यांचा अर्ज प्राप्त झाला असून यांचा अर्जात नमूद मौजा पेवठा ख.क्र. ७८ ले आउट मधील मंजूर रहिवासी अभिन्यास हस्तांतरण करण्याबाबत अर्ज प्राप्त झाला असून सदर अर्जाचे अनुषंगाने मा.कार्यकारी अभियंता (मेट्रो) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सदर नागपुर तसेच विभागीय अधिकारी (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हनुमान नगर झोन नागपूर यांना मौजा पेवठा ख.क्र. ७८ या ले आऊट मधील आपल्या सोबत केलेल्या करारनामा क्र. E.E(Metro)/A.E-1/५९९६दिनांक १०/०८/२०१६ नुसार केलेल्या करारनामा प्रमाणे सुविधा पूर्ण झाले की कसे याबाबत अभिप्राय मागविण्याबाबत दिनांक १३/१०/२०२० रोजी ग्रा.पं. ने पत्र दिले होते. व मा.सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा.अभि./ ना.म.प्र.वि.प्रा. ५२८ दिनांक २७/१०/२०२० रोजीचे पत्राची सत्यप्रत ग्राम पंचायतला दिनांक २४/१२/२०२० रोजी श्री रामदेव अग्रवाल यांचे मार्फत प्राप्त झाले. सदर अर्जाचे व ना.प्र.म.वि.प्रा. यांचे पत्राचे अनुषंगाने ग्राम पंचायत मासिक सभा दिनांक २८/१२/२०२० ठराव क्र. ०९ /०१ अन्वये सदर अर्जाचे व पत्राचे मासिक सभेमध्ये वाचन करण्यात आले. व पत्रात नमूद आहे की मौजा पेवठा ख.क्र. ७८ लेआउट मध्ये विकास कामे करण्याबाबत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत विकास करारनामा झालेला असून विकास						

(P.T.O)

				करारनामा मधील अट क्र. १७,B,C,D,E,F नुसार विकासकाने अभिन्यासातील रस्त्याचे डांबरीकरण, मलवाहिका, पर्जन्यवाहिका, जलवाहिनीचे काम व खुल्या जागेस चेन लिंक फेंसिंगचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. सदर पत्राचे अनुषंगाने व सदर पत्राचे अधीन राहून ग्रा.पं.कमेटी सर्वानुमते ठरवीत आहे की वरील ले आउट हस्तांतरित करण्यास तयार असून पत्रात नमूद बाबीची व कामाची देखभाल व दुरुस्ती करण्याचे ग्रा.पं.मंजुरी प्रदान करित आहे. परंतु सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. ५२८ दिनांक २७/१०/२०२० रोजीचे पत्राचे अधीन राहून पत्रात नमूद बाबीला काम पूर्ण झाले असे मानून वरील ले आउट शासनाचे अटी व शर्ती व वरील पत्राचे अधीन राहून हस्तांतरित करण्यात यावे व कामाची देखभाल व दुरुस्ती हस्तांतरणानंतर ग्रा.पं. करण्यास तयार आहे. तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर कर आकारणी ——— जोपर्यंत प्लॉट धारकाचे नावाने टॅक्स लागत नाही तोपर्यंत ले आऊट धारकाचेच नावाने टॅक्स राहील व ले आऊट धारकांनाच टॅक्स भरणा करावा लागेल. त्या अटीवर हस्तांतरण व देखभाल दुरुस्ती ग्रा.पं. करण्यास तयार असून ना.म.प्र.वि.प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित ले आउट धारक यांची राहील असे सभेत ठरवून ठराव सर्वानुमते मंजूर. सत्यप्रत सरपंच सचिव गट ग्राम पंचायत खरसोली	--	--	--	पास	--	

कार्यालय ग्रा. पंचायत खरसोली
प.सं./ना.क्र. 932
दि. 3/11/20
ता.जि. नागपूर